Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत बालकेंद्री शिक्षणात रंगमंचाच्या भूमिकेची परिणामकारकता' - एक विश्लेषणात्मक अभ्यास

**प्रा. प्रियंका इंगोले**
स्व शिवरामजी हिवसे अध्यापक महाविद्यालय वरुड

## सारांश

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 20-20 मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला असून बालकेंद्रीत, अनुभव आधारित, खेळ आधारित आणि कला समन्वित शिक्षणाला प्राधान्य दिले आहे. या पार्श्वभूमीवर रंगमंच हे प्रभावी अध्यापन माध्यम म्हणून महत्त्वपूर्ण ठरते. नाट्य,भूमिका निर्वाह, कथाकथन आणि सर्जनशील उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा शिक्षणातील सक्रिय सहभाग वाढतो तसेच भाषा, संवाद-कौशल्य, सर्जनशीलता, आत्मविश्वास, चिकित्सक विचार सहकार्याची भावना, आणि सामाजिक भावनिक कौशल्याचा विकास होतो. या संशोधनाचा मुख्य उद्देश NEP 20-20 मधील बालकेंद्रीय शिक्षणाच्या संकल्पनेच्या अनुषंगाने रंगमंचाची भूमिका आणि उपयुक्तता अभ्यासणे हा आहे यासाठी उपलब्ध संशोधन साहित्य,शैक्षणिक धोरण आणि संबंधित अभ्यासाचा आढावा घेण्यात आला आहे.यावरून असे निदर्शनास आले की नाट्य आधारित अध्यापनामुळे विद्यार्थ्यांची शिक्षणातील रुची, सहभाग आणि आकलन वाढते तसेच शिक्षण अधिक आनंददायी, अर्थपूर्ण आणि अनुभव संपन्न बनते.

## प्रस्तावना-

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 20-20 हे भारतीय शिक्षण व्यवस्थेला अधिक समावेशक, गुणवत्तापूर्ण, कौशल्यभिमुख आणि बालकेंद्रीत बनवण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देत असताना विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता प्रत्यक्ष अनुभव, निरीक्षण, संवाद आणि सर्जनशील कृतीच्या माध्यमातून ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे.बालकेंद्रित शिक्षणामध्ये विद्यार्थी हा शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू असतो प्रत्येक विद्यार्थ्याची आवड, क्षमता, शिकण्याची गती आणि वैयक्तिक गरजा लक्षात घेऊन अध्यापनाची रचना केली जाते अशा शिक्षण पद्धतीमध्ये शिक्षक हा ज्ञान देणारा नसून मार्गदर्शक आणि सहकारी म्हणून कार्य करतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वअ ध्ययन, चिकित्सक विचार, समस्या सोडविण्याची क्षमता, संवाद कौशल्य याचा विकास होतो. NEP2020 मध्ये कला समन्वित शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले असून रंगमंच हे त्यातील एक प्रभावी साधन आहे. शिक्षण अधिक जीवनाभमुख, आनंददायी आणि विद्यार्थी केंद्रित करण्यासाठी नाट्य आधारित अध्यापनाचा प्रभावी वापर करणे ही काळाची गरज आहे.

## बालकेंद्रीत शिक्षणाची संकल्पना-

बालकेंद्रित शिक्षण ही अशी शिक्षण पद्धती आहे ज्यामध्ये बालक हा शिक्षण प्रक्रियेचा केंद्रबिंदू मानला जातो. या पद्धतीत विद्यार्थ्यांची आवड, गरज, क्षमता, अनुभव, शिकण्याची गती आणि वैयक्तिक भिन्नता यांचा विचार करून अध्यापनाची आखणी केली जाते. बालकेंद्रीत शिक्षणात विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यास, स्वतः अनुभव घेण्यास, निरीक्षण करण्यास, प्रयोग करण्यास, चर्चा आणि समस्यांचे निराकरण करण्यास प्रोत्साहन दिले जाते त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचार, सर्जनशीलता,आत्मविश्वास, संवाद कौशल्य आणि निर्णय क्षमता विकसित होते. या प्रक्रियेत रंगमंच,कथाकथन, भूमिका,उपक्रम इत्यादीचा उपयोग विद्यार्थी सहभागासाठी महत्त्वाचा ठरतो.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## रंगमंचाची संकल्पना आणि प्रकार-

रंगपंच म्हणजे विचार, भावना, अनुभव आणि कल्पना यांची अभिनय,संवाद, हालचाल, संगीत वेशभूषा आणि नेपथ्य यांच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर सादरीकरण करण्याची कला होय. रंगमंच हे केवळ मनोरंजनांचे साधन नसून शिक्षण, सामाजिक जाणीव आणि व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी माध्यम आहे. रंगमंच विद्यार्थ्याला स्वतःचे विचार व्यक्त करण्याची संधी देतो.

## रंगमंचाचे प्रकार -

नाट्यरंगमंच (Drama Theatre)

बालरंगमंच (Children's Theatre)

शैक्षणिक रंगमंच (Educational Theatre)

सर्जनशील रंगमंच (Creative Theatre

भूमिका निर्वाह (Role Play)

कठपुतली रंगमंच (Puppet Theatre)

लोकनाट्य रंगमंच (Folk Theatre)

## NEP 2020 आणि बालकेंद्रित शिक्षणाचा संबंध-

प्रत्येक बालकाची आवड, क्षमता आणि शिकण्याच्या गतीनुसार शिक्षण दिले जाते.

खेळ कृती अनुभव आणि चर्चेद्वारे शिक्षण दिले जाते

सर्जनशीलता, चिकित्सक विचार, संवाद आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित करता येते.

शिक्षक हा ज्ञान देणारा नसून मार्गदर्शकाच्या भूमिकेतून कार्य करतो.

## बालकेंद्रित शिक्षणात रंगमंचाचे महत्त्व -

रंगमंचाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवता येतो.

विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य उच्चार आणि संवाद कौशल्य सुधारता येते.

विद्यार्थ्यांची सर्जनशीलता व कल्पनाशक्ती विकसित करता येते.

रंगमंचाच्या प्रभावी उपयोगाने विद्यार्थी समूह कार्य नेतृत्व आणि सहकार्य शिकण्यास प्रवृत्त होतात.

विद्यार्थ्यांमध्ये वेगवेगळ्या भूमिका द्वारे सामाजिक व भावनिक संवेदनशीलता विकसित करता येते.

विद्यार्थ्यांना अनुभवातून संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येतात.

## संशोधन विषयाची उद्दिष्टे -

NEP2020 मधील बालक केंद्रित शिक्षणाची संकल्पना समजून घेणे.2. रंगमंचाचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर होणारा परिणाम अभ्यासणे.

अध्यापनात रंगमंचाच्या वापरामुळे शिकण्याची गुणवत्ता कशी वाढते हे तपासणे.

NEP 20-20 च्या अंमलबजावणीत रंगमंचाची भूमिका स्पष्ट करणे.

## संशोधन पद्धती-

वस्तू संशोधनामध्ये विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. या पद्धतीद्वारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 अंतर्गत बालकेंद्र शिक्षणामध्ये रंगमंचाचे महत्त्व विविध शैक्षणिक स्रोतांच्या आधारे सखोलपणे अभ्यासून रंगमंचाची परिणामकारकता तपासण्यात आली.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## बालकेंद्रित शिक्षणात रंगमंचाचे परिणामकारक -

विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढविणे - बालकेंद्रीत शिक्षणात रंगमंचीय उपक्रमांमध्ये विद्यार्थी अभिनय,संवाद, हालचाल आणि सादरीकरण यामध्ये सक्रियपणे सहभागी होतात त्यामुळे शिकण्यातील उंची वाढते आणि वर्गातील सहभाग अधिक प्रभावी होतो.

संवाद कौशल्याचा विकास - नाट्यप्रयोग, भूमिका निर्वाह आणि कथाकथन यामुळे विद्यार्थ्यांच्या भाषिक क्षमता, उच्चार,शब्द संपत्ती आणि विचार व्यक्त करण्याच्या कौशल्यात सुधारणा होते.

आत्मविश्वास वाढविणे- रंगमंचावर भूमिका साकारल्यामुळे विद्यार्थ्यांमधील संकोच कमी होतो आणि स्वतःचे विचार मांडण्याचा आत्मविश्वास वाढतो.

सर्जनशीलता आणि कल्पनाशक्तीचा विकास - बालकेंद्रित शिक्षणात रंगमंच विद्यार्थ्यांना नवीन कल्पना मांडण्याची, कथा तयार करण्याची आणि विविध समस्या सर्जनशील पद्धतीने सोडविण्याची संधी देते.

सामाजिक व भावनिक विकास - समूहामध्ये नाटक सादर करताना सहकार्य, नेतृत्व, जबाबदारी, सहानुभूती आणि इतरांच्या विचारांचा आदर करण्याची भावना विकसित होते.

अनुभवाधारित शिक्षणाला चालना- रंगमंचामुळे विद्यार्थी प्रतीक्षा अनुभवातून शिकतात त्यामुळे विषयाच्या आकलन अधिक प्रभावी होते आणि शिकलेले ज्ञान दीर्घकाळ स्मरणात राहते.

सर्वसमावेशक शिक्षणास मदत- रंगमंचामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला सहभागी होण्याची संधी मिळते त्यामुळे विविध क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांचा सहभाग वाढतो आणि समान संधीचे वातावरण निर्माण होते.

NEP 20-20 च्या उद्दिष्टांशी सुसंगत- कला समन्वित आणि कौशल्य आधारित शिक्षणावर भर देण्यात आला आहे. रंगमंच या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो आणि शिक्षण अधिक बालकेंद्रीत बनते.

## निष्कर्ष-

रंगमंचामुळे विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेत सक्रिय सहभागी होतात आणि स्वतःच्या अनुभवातून शिकतात.

नाट्य भूमिका निर्वाह आणि सादरीकरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक,भावनिक, सामाजिक आणि सर्जनशील विकास म्हणजेच सर्वांगीण विकास होतो.

रंगमंचीय उपक्रमामुळे भाषा वापरण्याची क्षमता, विचार व्यक्त करण्याचे कौशल्य आणि आत्मविश्वास वाढतो त्यामुळे संवाद कौशल्यात सुधारणा होते.

कथा निर्मित अभिनय आणि समस्या सोडविण्याच्या प्रक्रियेतून नवीन विचार करण्याची क्षमता विकसित होते म्हणजेच विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि कल्पनाशक्ती वाढते.

सार्वजनिक सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांमधील भीती कमी होऊन नेतृत्व गुण विकसित होतात, आत्मविश्वास वाढतो.

नाट्यप्रयोग करताना सहकार्य, जबाबदारी,शिस्त, सहानुभूती आणि इतरांचा आदर करण्याची भावना निर्माण होते त्यातून सामाजिक मूल्यांचा विकास होतो.

प्रत्यक्ष कृती व अनुभवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विषयाचे सखोल आकलन होते.

शिक्षकाने योग्य नियोजन करून अभ्यासक्रमाशी संबंधित रंगमंचे उपक्रमांचा वापर केल्यास शिक्षण अधिक प्रभावी बनते.

आनंददायी शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञानदानाची प्रक्रिया पूर्ण करता येते.

NEP 20-20 ची कला व अनुभवातिष्ठित शिक्षणाची उद्दिष्टे साकारता येते व त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## संदर्भ ग्रंथ सूची-

अग्रवाल जे सी (2014)'अध्यापनाची तत्वे पद्धती आणि तंत्र', विकास पब्लिकेशन न्यू दिल्ली.

कुलकर्णी ए बी(2012)' शिक्षण शास्त्राची मूलतत्वे', विद्या प्रकाशन पुणे.

पाटील एस एस (2015)'आधुनिक अध्यापन पद्धती', फडके प्रकाशन कोल्हापूर.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) शिक्षण विषयक मार्गदर्शिका, पुणे.

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद(NCERT 2005) राष्ट्रीय अभ्यासक्रमा आराखडा NCERTनवी दिल्ली.

Macisci M. (2004) Theatre and Education Rutledge, LONDON.